मराठवाडा अपंग संघटना, लातूर संचलीत
१) मराठवाडा अपंग प्रशिक्षण केंद्र लातूर व
२) माहेर अस्थिव्यंग मुलींचे निवासी
विद्यालय, लातूर या शाळेवर /कार्यशाळेवर
प्रशासक नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्र. इडीडी २००८/प्र.क्र.१२१/अ.क.१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०८ सप्टेंबर, २०१७.

वाचा:- १) शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्र.इडीडी २००४/प्र.क्र.३/सुधार-२, दि.९ मार्च, २००४.
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.इडीडी २००८/प्र.क्र.१२१/ सुधार-२, दि.९.३.२०१० व समक्रमांक शुध्दीपत्रक दि.१४.११.२०११.
३) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.अकआ/प्र-३-अस्थि/ मराठवाडा/प्रशासक नियुक्ती/लातूर/२०१६-१७/६४, दि.९.१.२०१७.

शासन निर्णय -

मराठवाडा अपंग संघटना, लातूर द्वारा संचलीत १) माहेर अस्थिव्यंग मुलींचे विद्यालय, लातूर व २) मराठवाडा अपंग प्रशिक्षण केंद्र, लातूर या अपंग मुलींच्या निवासी शाळा/कर्मशाळेवर प्रशासकाची नियुक्तीस मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी शासनास सादर केलेला आहे. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्या अहवालात शाळेचे व्यवस्थापन व कर्मचारी यांच्यामध्ये गैरव्यवस्थापनाबाबत वाद निर्माण होऊन त्याबाबतच्या तक्रारी मा.धर्मादाय आयुक्त, जिल्हा लातूर यांच्याकडे सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे सदरहू कर्मशाळा/शाळेवर प्रशासकास मुदतवाढ देण्याबाबतची विनंती शासनास केलेली आहे.

२. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणा-या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा व्यवस्थापनेसाठी प्रशासकांची नियुक्ती करण्यासंदर्भातील शासन निर्णय दि.९.३.२००४ मधील तरतूदीनुसार तसेच अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ मधील तरतूदीनुसार अपंग विद्यार्थ्यांस सोईसुविधा पुरविण्यास व्यवस्थापन सक्षम असल्याची खात्री होईपर्यंत अशा संस्थेचे व्यवस्थापन ताब्यात घेऊन शाळेच्या कामकाजात सुधारणा होईपर्यंत अथवा व्यवस्थापनातील मतभेद संपेपर्यंत, यापैकी जी घटना अगोदर घडेल तोपर्यंत त्या संस्थेवर प्रशासकांची नियुक्ती करण्याबाबतचे अधिकार शासनास राहील, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

३. त्यामुळे सदर संस्थेला प्रशासकास नियुक्ती देण्याबाबत आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी शिफारस केल्यानुसार तसेच मा.मंत्री (सा.न्या.) यांच्या निर्देशानुसार जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, लातूर यांची सदर संस्थेच्या प्रशासक पदावर नियुक्ती करण्यात येत आहे.

४. दरम्यानच्या काळात संस्थेचे कामकाज सुरळीत झाल्याबाबतचा अहवाल आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्याकडून शासनास अहवाल प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे सदर शाळेवर नेमणूक केलेल्या प्रशासकाबाबत उचित निर्णय घेण्यात येईल.

५. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, लातूर यांनी सदर शाळेचे दैनंदिन कामकाज सुरळीतरित्या पार पाडले जाईल याबाबत उचित कार्यवाही करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचे संकेतांक २०१७०९०८१६०५१३७१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh
Ramchandra
Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2017.09.08 15:55:08 +05'30'

(दि. रा. डिंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
२) सचिव (सा.न्या.) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
३) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
५) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, लातूर
६) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर
८) अध्यक्ष, मराठवाडा अपंग संघटना, लातूर द्वारा संचलीत १) माहेर अस्थिव्यंग मुलींचे निवासी विद्यालय, लातूर व २) मराठवाडा अपंग प्रशिक्षण केंद्र, लातूर.
९) निवड नस्ती, अपंग कल्याण-१.

****